MHNS130008402019

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | २९/०७/२०१९ |
| नोंदणी तारीख | :– | २९/०७/२०१९ |
| निकाल तारीख | :– | २४/०७/२०२६ |
| कालावधी | :– | वर्ष, महीना, दिवस |
| | | ०६ ११ २६ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपळगांव ब., ता.निफाड, जि.नाशिक.**

**(पिठासीन अधिकारी श्री. ए.जे. पाटील)**

**नियमित फौजदारी खटला क्र.९४/२०१९ निशाणी क्रमांक ३८**

**प्रथम खबर मधील तपशिल** :–

अपराध क्रमांक : ४२/२०१९, दिनांक १६/०४/२०१९

पोलीस स्टेशन : ओझर, ता.निफाड, जि.नाशिक.

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष –** | महाराष्ट्र सरकारतर्फे, पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन ओझर, ता.निफाड, जि.नाशिक. |
| **अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ –** | श्रीमती ए.ए.शेख |
| **आरोपी –** | **१. विशाल पोपट वाघमारे,** वय–२९ वर्षे,<br>**२. शाम राजाराम सिन्नरकर**, वय – २७<br>रा.पंचशील नगर, ओझर, जि.नाशिक.<br>**३. राजेंद्र बाळासाहेब जाधव उर्फ बेंडक्या राजा,** वय ३९<br>रा.मिलींद नगर, राजवाडा, ओझर,जि.नाशिक. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ –** | श्री.पी.बी.हाडोळे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १५/०४/२०१९ |
| गुन्हा दाखल तारीख | १६/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २४/०७/२०१९ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | २९/०७/२०१९ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १५/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | २४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४/०७/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | ---- |

## आरोपीचे विवरण

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर/ सुचनापत्रावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विशाल पोपट वाघमारे | १७/०४/२०१९ | २०/०४/२०१९ | भा.दं.वि.कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | --- | --- |
| २. | शाम राजाराम सिन्नरकर | १७/०४/२०१९ | २०/०४/२०१९ | भा.दं.वि.कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | --- | --- |
| ३. | राजेंद्र बाळासाहेब जाधव उर्फ बेंडक्या राजा | १७/०४/२०१९ | २०/०४/२०१९ | भा.दं.वि.कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | --- | --- |

## तपासलेले साक्षीदार

### अ. अभियोगपक्षातर्फे :-

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी |
|---|---|---|---|
| सा.क्र.१. | तस्लीम हमीद खाटीक | फिर्यादी | ३४ |
| सा.क्र.२ | शकील युनुस खाटीक | फिर्यादीचा चुलत भाऊ | ३६ |

**ब. बचावपक्षातर्फे :– नाही.**

**क. न्यायालयातर्फे :– नाही.**

## निशाणी क्रमांकाची यादी

**अ. अभियोगपक्षातर्फे :–**

| अ.क्र. | निशाणी | पुराव्याचे स्थान |
|---|---|---|
| १. | ३५ | फिर्यादवरील सहीस |
| १. | –– | सा.क्र.१ च्या जबाबातील मजकुरास रेखांकित भाग–अ |
| २. | –– | सा.क्र.२ च्या जबाबातील मजकुरास रेखांकित भाग–अ |

**ब. बचावपक्षातर्फे :– नाही.**

**क. न्यायालयातर्फे :– नाही.**

**ड. मुद्देमाल :– नाही.**

.........................................................................................................................................

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक २४ जुलै, २०२६)

**०१)** आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान,१८६० चे कलम (संक्षिप्त ''भा.दं.वि.'') ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

### अभियोग पक्षाचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे –

**०२)** फिर्यादी तस्लीम हमीद खाटीक ही दि.१५/०४/२०१९ रोजी रात्री ०९:१५ वाजताच्या सुमारास समतानगर येथे तिची असलेली पानटपरी बंद करीत असतांना तेथे एक काळया रंगाची पल्सर गाडी क्र.९२७७ यावर आरोपी आले. त्यांच्या हातात बियरच्या बाटल्या होत्या व ते वाईटसाईट शिवीगाळ करीत जात होते. तेव्हा फिर्यादीने त्यांना शिवीगाळ करु नका असे म्हणाली. तेव्हा आरोपींनी फिर्यादीला सांगितले की, 'तुला काय करायचे, गप्प बस' असे म्हणून शिवीगाळ केली. आरोपी

क्र.१ ने फिर्यादीचा हात पकडला. फिर्यादी आरडाओरडा करु लागली तेव्हा तिचा भाऊ शकील खाटीक हा आला. त्याने आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ का करत आहेत असे विचारले. आरोपींना त्याचा राग आला व त्यांनी त्यास वाईटसाईट शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी व हाताचापटीने मारहाण केली. आरोपींनी तुझ्याकडे बघून घेतो असा दम दिला.

**०३)** फिर्यादीने ओझर पोलिस ठाणे येथे आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली. सदर तक्रारीवरुन अपराध क्र.४२/२०१९ नोंद झाला. पोउपनि/ए.पी.कवडे यांनी गुन्हयाचा तपास केला. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. फिर्यादीचा व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपींना अटक केली. संपूर्ण तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०४)** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भा.दं.वि.चे कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दोषारोप (निशाणी १८) निश्चीत केला. आरोपींनी गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षेची मागणी केली.

**०५)** अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. आरोपींविरुध्द अभिलेखावर पुरावा उपलब्ध नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) अन्वये आरोपीचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

**०६)** दोन्ही पक्षातर्फे युक्तीवाद ऐकण्यात आला. खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरिता माझे विचारार्थ असून त्यावर मी सकारण निष्कर्ष नोंदविले आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.१५/०४/२०१९ रोजी रात्री ०९:१५ वाजता समतानगर, ओझर येथे आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्ततेसाठी फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | उद्देशाने तिच्यावर फौजदारीपात्र बलप्रयोग केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | नकारार्थी... |
| २. | वर नमुद तारखेस, ठिकाणी व वेळी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्ततेसाठी फिर्यादीच्या भावाला लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | नकारार्थी... |
| ३. | वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्ततेसाठी फिर्यादी व तिच्या भावाचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | नकारार्थी... |
| ४. | वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्ततेसाठी फिर्यादी व तिच्या भावाला धमकी दिल्याचे अभियोगपक्ष सिध्द केले काय ? | | नकारार्थी... |
| ५. | अंतिम आदेश काय ? | | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ४ च्या अनुषंगाने –**

**०७)** फिर्यादीने तिच्या पुराव्यात असे कथन केले की, ती आरोपींना ओळखते. सन २०१९ मध्ये तिची समतानगर येथे पानपट्टी होती. दि.१५/०४/२०१९ रोजी रात्री ९:१५ वाजता ती पानटपरी येथे होती. त्यावेळी तिचा व आरोपींचा किरकोळ वाद झाला होता. आरोपींनी तिला शिवीगाळ केली असे घडले नव्हते. आरोपींनी तिचा हात पकडला असे घडले नव्हते. आरोपींच्या तिच्या भावाला मारहाण केली असे घडले नव्हते. तिने पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. परंतु, त्यातील मजकूर तिला माहिती नाही.

०८) शकील (अ.सा.क्र.२) याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, फिर्यादी त्याची चुलत बहिण आहे. तो सर्व आरोपींना ओळखतो. दि.१५/०४/२०१९ रोजी रात्री ०९:१५ वाजता त्याचा व आरोपींचा किरकोळ वाद झाला होता. आरोपींनी त्याला व फिर्यादीला शिवीगाळ केली असे घडले नव्हते. आणखी काही झाले नव्हते. पोलिसांनी त्याचे बयाण नोंदविले होते.

०९) दोन्ही साक्षीदारांनी पोलिस बयाणातील मजकूराशी विसंगत साक्ष दिल्याने सहायक सरकारी अभियोक्त्या यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची अभियोग पक्षाला परवानगी देण्यात आली. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. त्यांनी सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिलीत. तसेच त्यांच्या फिर्याद व जबाबामध्ये नमूद घटना घडल्या होत्या असे त्यांनी पोलिसांना सांगितले नव्हते असे कथन केले. त्यामध्ये त्या घटना घडल्या होत्या असे का नमुद आहे याचे कारण ते सांगु शकत नाहीत असे कथन केले.

१०) सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड केल्याचे त्यांनी कथन केले. त्यामुळे असे दिसून येते की, साक्षीदार हे आरोपींसोबत झालेल्या समझोत्यामुळे आरोपींविरुध्द न्यायालयात काहीही कथन करीत नाहीत. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपींविरुध्द लावण्यात आलेले आरोप निसंशयपणे सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ४ ला नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ च्या अनुषंगाने</u> –**

११) मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी दिल्यामुळे, आरोपी हे या गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्या अनुषंगाने मुद्दा क्र.५ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | **आरोपी क्र.१ ते ३** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार भा.दं.वि.चे कलम ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ मधील अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात आली. |
| २. | आरोपींचे जमानतपत्र व बंधपत्र रद्द करण्यात आले. |
| ३. | आरोपींनी कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत प्रत्येकी रुपये १५,०००/– चा वैयक्तीक बंधपत्र व जामीन या न्यायालयात सादर करावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

स्वा/–

ठिकाण – पिंपळगांव
दिनांक – २४/०७/२०२६.

**(ए. जे. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपळगांव.

**Visit ecourts.gov.in for updates or download mobile app "eCourts Services" from Android or iOS**